divyamarathi.com

# चाळीसगाव-धुळे पॅसेंजरच्या सेवेला उद्या १२१ वर्षे पूर्ण

## वर्षभरापासून सेवा बंद असलेल्या गाडीची रेल्वे प्रवाशांना प्रतीक्षा

**प्रतिनिधी** | चाळीसगाव

जळगाव आणि धुळे जिल्ह्याचे नाते दृढ करणारी चाळीसगाव- धुळे पॅसेंजर गाडीची सेवा १५ ऑक्टोबर १९०९ रोजी कोळशाच्या इंजिनाद्वारे सुरू झाली होती. कालांतराने या गाडीत अनेक बदल झाले. १९८५ पासून ही गाडी डिझेल इंजिनाच्या मदतीने धावत आहे. या गाडीला पूर्वी 'दुधगाडी' म्हणून ओळखले जात होते. शुक्रवारी (दि.१५) रोनी गाडीच्या सेवेला १२१ वर्षे पूर्ण होत आहेत. कोरोनामुळे गेल्या वर्षभरापासून बंद असलेली गाडीची सेवा आतातरी सुरू होईल, अशी प्रवाशांची अपेक्षा आहे.

कोळशाचे इंजिन, त्यानंतर डिझेल इंजिन व सध्या इलेक्ट्रीक इंजिन असा प्रवास करणारी ही पॅसेंजर गाडी सर्वसामान्यांच्या प्रवासासाठी हक्काचे साधन आहे. सुरूवातीच्या काळात याच पॅसेंजरने चाळीसगाव येथून धुळ्यापर्यंत दुधाची वाहतूक केली जात होती. या गाडीच्या दिवसातून चार फेऱ्या होत असत. वर्षभरापासून गाडी बंद आहे.

**१५ रुपये भाडे :** चाळीसगाव- धुळे या मार्गावर ५६ किमीच्या प्रवासात गाडी भोरस, जामदा, राजमाने, मोरदड तांडा, शिरुड, बोरविहिर, मोहाडी व धुळे या ८ स्थानकांवर थांबते. मध्य रेल्वेच्या अखत्यारीत असलेल्या या रेल्वेने चाळीसगावातून धुळ्यापर्यंत दुधाची वाहतूक केली जात होती. पुढे हे दूध मुंबईला पाठवले जात होते. या गाडीने अवघ्या १५ रुपयात चाळीसगाव ते धुळे प्रवास करता येतो. याच मार्गावर बसने जायचे म्हटल्यास ७५ रुपये भाडे द्यावे लागते. त्यामुळे सर्वसामान्यांना भूर्दंड बसतो.

### गाडीबाबत आदेश नाहीत

*कोरोनामुळे बंद पडलेल्या या गाडीची सेवा सुरू करण्यासंदर्भात वरिष्ठांचे कुठलेही आदेश नाहीत. आदेश प्राप्त झाल्यानंतर गाडी सुरू करण्यात येईल. सध्या गाडीची सेवा बंद असल्याने तिचा वाढदिवसही साजरा होऊ शकत नाही.*

**एन.पी.बडगुजर,** स्टेशन प्रबंधक, चाळीसगाव